# भारताचे परराष्ट्रीय धोरण – एक वास्तववादी चिंतन

## (विशेष संदर्भ – भारत, पाकिस्तान, चीन, अफगाणिस्तान संबध.)

**प्रा. विरेंद्र मुरलीधर घरडे**
*राज्यशास्त्र विभाग*
*गंगामाई एज्युट्रस्टचे कला, वाणिज्य, व विज्ञान महाविध्यालय*
*नगाव. ता. जि. धुळे.*

**प्रस्तावना :-**

भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा मुख्य आधार स्तंभ हा शांती, सहकार्य आणि सहजीवन असा आहे. या तीन तत्वानुसारच भारतीय सरकार वर्तनकरत असते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा यांचा समतोल राखणे तसेच आंतराष्ट्रीय समस्याचे निराकरण शांतीमय वातावरणात करण्याचा मुख्य आधार भारतीय परराष्ट्रीय धोरणाचा असल्याने युध्दासारख्या अनैतिक तत्वाचा विरोध भारत सतत आपल्या परराष्ट्रीय धोरणातुन करत असतो. प्रस्तुत शोधनिबंधात भारतची दक्षिण आभियायी राष्ट्राबद्दल विशेष करून पाकिस्तान, चीन, अफगाणिस्तानाबाबत चालू वास्तवादी धोरणाची चर्चा केलेली आहे. भारताने अलित्पतावादाचे समर्थन करून आंतरराष्ट्रीय स्तरावर आतरराष्ट्रीय संबंधात समतोल साधन्याचा प्रयत्न केला आहे. त्या समतोलाची साधक बाधक चर्चा पाकिस्तान, चीन, अफगाणिस्तान बाबत प्रस्तुत शोधनिबंधात केली आहे.

**उद्देश :-**

प्रस्तुत शोधनिबंधात अफगाणिस्तान मधे तालेबाणी सरकार स्थापन झाल्यानंतर त्याचा परीणाम भारत-पाकिस्तान व चीनच्या संबंध कसा पडेल या वास्तववादी चिंतन करणे हा प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश आहे.

**महत्व :-**

दक्षिण आशियायी राष्ट्रात भारत एक मुख्य शक्ती म्हणून उद्यास येत आहे. त्यामुळे भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा परीणाम इतर राष्ट्रांच्या धोरणावर मोठ्या प्रमाणत होत असल्यामुळे त्या अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**हेतू :-**

प्रस्तुत शोधनिबंधाचा हेतु चीन, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान मधील बदलत्या राजकीय व सामाजिक धोरणाचा परीणाम भारतावर कसा होईल व भारताने या बदलत्या धोरणामुळे आपल्या परराष्ट्रीय धोरणात कसे बदल करावे हे सुचवणे हा मुख्य हेतू आहे.

**मुख्य शब्द :-**

सामाजिक आर्थिक राजकीय धोरणे, सत्ताबदल, दहशतवाद, दहशतवादी संघटना, काश्मिर प्रश्न, गलवानघाटी प्रश्न, आर्थिक बंदी, चीनचा सीमा वाद, तालेबान सरकार, धोरणातील बदल, पंचशिल धोरण, करार, सहकार्य, सहजीवन, यु.एन.ओ, ब्रीक्स, सार्क.

**गृहितक :-**

(१) भारताचे पाकिस्तान, चीन, अफगाणिस्तान बरोबरचे संबंध तणावग्रस्त असल्याने त्याचा परीणाम आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्री धोरणावर होतो.
(२) परीस्थितीनुसार भारताने परराष्ट्र धोरणात बदल करणे आवश्यक ठरते.

**संशोधन पध्द्ती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सांमाजिक शास्त्रे संशोधनातील विश्लेषणात्मक व वर्णणात्मक संशोधन पध्द्तीचा उपयोग करण्यात आला आहे.

**विश्लेषण :-**

भारत हे लोकशाही प्रधान राष्ट्र आहे. संविधाने ठरवून दिलेल्या कायद्याच्या चौकटीत राहूनच भारताला आंतरराष्ट्रीय धोरणे व वर्तन ठरवावी लागतात भारतात संविधानातील मार्गदर्शक तत्वानुसार कलम ५१ नुसार “आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता व सामजस्य राखणे[१] ही भारत सरकारची प्रथम जबाबदारी आहे. असे स्पष्ट नमुद केले आहे. व हे परराष्ट्रीय धोरण ठरविण्याचा अधिकार पंतप्रधानांचा असल्याने पंतप्रधान हा परराष्ट्राबाबत तटस्थ राहणे महत्वाचे आहे.

जॉन मॉडेस्की यांच्या मते “परराष्ट्रधोरण राज्यांच्या वेगवेगळ्या घटनांचे व्यवस्थित आणि विकसित रुप आहे. त्यांच्या माध्यमाव्द्रारे दुसऱ्या राज्यांचे व्यवहार बदलते अथवा आपल्या धोरणास आंतरराष्ट्रीय

वातावरणास बदलण्याचा प्रयत्न करणे म्हणजे परराष्ट्र धोरण होय."(२) जोसेफ फ्रँकविल यांच्या मते "राष्ट्रीय हित हा परराष्ट्र धोरणाचा मुलभूत पाया आहे."(३)

**भारत-पाकिस्तान संबंध :-**

भारत-पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र असले तरी दोघांचे संबंध अत्यंत तनावग्रस्त आहे. विशेष करुन काश्मिरच्या मुद्दयावरून या दोन्ही राष्ट्रात कमालीचे तनावाचे बातावरण निर्मिण झाले आहे. पाकिस्तानचा आतंकवाद्यांशी असलेला संबंध व पाकिस्तानात असलेल्या विविध अतिरेकी संधटना यांना वेळोवेळी पाकिस्तानाने मदत करून भारतात आंतकवादी कारवाया, बॉम्ब स्फोट या सारखी देशद्रोही कृत्ये पाकिस्तान समर्थित आंतवाद्याकडून घडून येत असल्यामुळे भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय धार्मिक क्षेत्रात कमालीची अशांतता निर्माण झाली आहे. पाकिस्तानाची तालेबान, अलकायदा, इसीस सारख्या अतिरेकी संघटेशी मैत्री असल्यामुळे परराष्ट्र स्तरावर भारत-पाकिस्तान यांचे संबंधात मोठी कटूता आहे. चीनचे पाकिस्तानशी असलेले संबंध चीनचा भारताला असलेला विरोध या सर्व कारणांनमुळे भारत-पाकिस्तान यांच्या तेढ निर्मिण झाले धर्मवाद, जातीवाद यावरून कश्मिरचे विभक्तीकरण करणे, यावरुन भारत-पाक यांच्या सतत छोटी-मोठी मुध्दे होत असतात. U.N.O मध्ये भारत सरकारने पाकिस्तानच्या कुटिलनिती बाबत वेळो वेळी आवाज उठवला तरी पाकिस्तानच्या कुरापात्या कमी झाल्या नाही. त्यामुळे सीमारेषेवर युध्दजन्य परीस्थिती निर्माण झाली जी दोन्ही देशासाठी अत्यत घातक आहे. वरील संबंध सुरळीत होण्यासाठी खालील उपाय महत्वाचे आहे.

(१) अणवस्त्र निर्मिती व त्यांच्या चाचणी बंदी आणणे.
(२) आंतवादी कारवाया रोखणे.
(३) काश्मिर प्रश्न समन्वय, करारच्या माध्यमातुन सोडविणे.
(४) सांस्कृतीक व आर्थिक देवाण घेवाण व व्यवहार वाढविणे व सुरळीत करणे.
(५) पाकिस्तानचे असलेले आंतवादी संबंध, ट्रेनिंग सेंटर, यावर आंतरराष्ट्रीय समुहाचा वचक बसविणे.
(६) धार्मिक व जातीवादी भावना भटकविण्याऱ्यानवर जबर नियंत्रण आणणे.
(७) भडकावू भाषणे, व नेतेमंडळीवरील चुकीच्या वक्तव्यांवर कायद्याने नियंत्रणे आणवी.
(८) भारत-पाकिस्तान प्रश्न (काश्मिर) हा वैयक्तिक असून इतर राष्ट्रांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास रोखणे.

**भारत आणि चीन संबंध :-**

भारत आणि चीन यांचे संबंध आधुनिक काळात अत्यंत तणावग्रस्त झाले आहे. चीन आणि भारत याचे स्वातंत्र्य भारताच्या उद्यापासुनच लदाखचा मुद्दा अक्साई चीनचा भाग असो किंवा भारत चीन यांची बॉर्डर असो यावरुनवादग्रस्त राहिले आहे, त्याच बरोबर अरुणाचल प्रदेशातील काही भागावर चीनने केलेला दावा आताच गलवान घाटीने चीनने केले आक्रमण इ. कारणामुळे भारत-चीन यांचे संबंध सुरळीत नसुन तणावग्रस्त आहे. तसेच पाकिस्तान आणि चीनची असलेली मैत्री, चीनने केलेला भारतावरील सायबर हल्ले भारताच्या अक्साई चीन वर असलेले चीनी नियंत्रण आणि मागील वर्षात कोरोना स्वरुपात भारतात केलेला. जैविक हल्याने इ. कारणामुळे भारतात आणि चीन यांचे संबंध अत्यंत वादग्रस्त आहे. बॉर्डरवर निर्मिण केलेल्या वसाहती यामुळे देखील चीन आणि भारत यांचे संबंध वादग्रस्त आहे. चीनने पंचशील धोरण स्विकारुन सुध्दा आणि हिंदी-चीनी भाई-भाई च्या नावावर वेळोवेळी धोखाधडी केली. त्याचबरोब U.N.O च्या स्थायी सुरक्षा समितीत भारताला स्थान मिळू नये म्हणून चीनने वेळोवेळी आंतरराष्ट्रीय स्तरावरून भारताला विरोध केल्याने तसेच दक्षिण अभियायी राष्ट्रात भारताचा दबाब कमी करण्याच्या हेतुने चीनचे वेळोवेळी आंतरराष्ट्रीय स्तरावर चालले छुपे प्रयत्न यामुळे दोघे राष्ट्रानमधे तणावाचे वातावरण आहे. हे तणावाचे वाद कमी करण्यासाठी काही प्रयत्न दोन्ही राष्ट्रांनी करणे महत्वाचे ठरते.

(१) अक्साई चीन, गलवान घाटी, अरुणाचलप्रदेशाचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविणे.
(२) लघाख वर चीनने ठेवलेले अप्रत्यक्ष नियंत्रण सोडणे.
(३) गलवान घाटीमध्ये असलेले चीनी सैन्य व तळ मागे घेणे.
(४) नियंत्रण रेषेचा आदर राखणे.
(५) आर्थिक व्यवहार सुरळीत करण्याचा प्रयत्न करणे व विश्वासघातकी प्रवृत्ती सोडणे.
(६) सीमा रेषेवरील सैन्य युध्दजन्य सामग्री दारुगोळा कमी करणे तसेच चीनने सुरू केलेली जैविक व निसर्गीक क्षेत्रातील प्रचंड बांधकामे उदा. रस्ते, पुल, बांध, वस्त्या यावर नियंत्रण करणे.

(७) तसेच स्थायी सुरक्षा समितीच्या पाच राष्ट्रामध्ये भारताला सहभाग म्हणून चीनने भारताला मदत करणे.

**भारत अफगाणिस्थान संबंध :-**

भारत अफगाणिस्तान यांचे संबंध तसे जुनेच आहे. अफगाणिस्तानातील मसाले पदार्थ, सुकामेवा किंवा जुट रेशम वस्तु असो किंवा भारताचे इतर आर्थिक व्यवहार हे अफगाणिस्तानबरोबर होत असलेल्या भारत आणि अफगाणिस्तानचा सांस्कृतीक संबंध देखील जवळचा आहे. अफगाणिस्तानात असलेले हिंदू धर्मातील प्रभावक्षेत्र, बौध्द धर्माचे अस्तित्व किंवा शिखांची मंदिरे इ. यामुळे देखील भारत आणि अफगाणिस्तान यांच्या सांस्कृतीक व धार्मिक एकोपा दिसून येतो.

परंतु अलीकडच्या काळात अफगाणिस्तान मधील बदललेली सामाजिक, आर्थिक, राजकीय परीस्थितीचा परीणाम भारताच्या अफगाणिस्तान बरोबर असलेल्या मैत्री संबंधावर होत आहे. अलीकडेच अमेरीकेचे सैन्य मायदेशी परतले आणि संपूर्ण अफगाणिस्तान वरील ताबा तालीबान या अतेरेकी संघटनेने घेतला. "बंदुकीच्या गोळीवर राज्य" करण्याचे धोरण तालीबानी संघटनेचे असल्याने त्यांनी अफगाणिस्तान मोठ्या प्रमाणात हत्या, अन्याय, अत्याचार, महिलांच्या मानवधिकाराचे हनन, राजकीय पुढारी, नेते यांच्या हत्या धोरण अवलंबिल्याने संपूर्ण जग तालीबाण्याच्या या धोरणा मुळे चिंताग्रस्त झाले. ब्रिक्स संघटना, U.N.O संघटना, मानवाधिकार आयोग यांनी तर तालीबाण्यानवर टिकास्त्र सोडले. पाकिस्तानच्या मदतीने सत्तास्थापन करणे तसेच आंतकवाद्याचे सहकार्य होऊन सत्ता स्थापन केल्याने भारताला भारत-अफगाण संबंधाची मोठी चिंता पडली आहे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान व चीन यांची वाढती मैत्री तसेच अफगाणिस्तानातील तालीबान्यांचा सहकार्याने पाकिस्तान भारतात विशेष म्हणजे काश्मिर मध्ये दहशतवादी कारवाया करण्याची भिती भारताला आहे. कारण तालीबाणी अतेरेकी आणि पाकिस्तानमधील अतिरेकी व संघटना या भारतात दहशतवादी कारवाया करुन भारताच्या सार्वभौमत्वाला, एकत्वाला, अखंडतेला खिंडार पांडून भारताने धार्मिक तत्वावर तुकडे पाडण्याची खरी भिती भारताला असल्याने भारता हा अफगाणिस्तानच्या परराष्ट्रीय संबंधाबाबत कमालीचा चिंताग्रस्त आहे. त्यामुळे मा. नरेंद्र मोदि सरकार देखील अफगाणिस्तानच्या घडामोडीवर लक्ष देऊन आपले परराष्ट्रीय धोरण ठरवत आहे. त्याचबरोबर रशिया, चीन, टर्की या राष्ट्रांनी तालेबानी सरकारला मान्यता दिल्यामुळे भारताच्या चिंतेत जास्तीच भर पडली आहे. त्याच बरोबर अफगाणिस्तानला अमेरीकेची चीनची आर्थिक मदत इत्यादी मुळे भारताला देखील याबाबत मैत्रीसंबधाला सकारात्मक नकारत्मक दोन्ही दुष्टिने विचार करून धोरण ठरविणे आवश्यक ठरेल. यात कमालीची घाई खुप धोखादायक ठरू शकेल. हे नाकारता येत नाही. म्हणून भारत-अफगाण परराष्ट्र धोरणाचा विचार करताना खालील गोष्टीचा विचार करणे आवश्यक ठरते.

(१) तालीबाणी सरकारचे धोरण भारतात बाबत सकारात्मक आहे की नकारात्म आहे.
(२) पाकिस्तान-अफगाण मैत्री संबंधात भारताबाबत कशी धोरणे ठरविली जातात.
(३) अफगाणिस्तानच्या मदतीने (तालेबान) पाकिस्तान जर दहशतवादी कारवाया भारतात घडवून आणत असेल तर अशा वेळेस भारताचे परराष्ट्र धोरण ताठर असावे.
(४) चीन जर अफगाणिस्तानच्या मदतीने भारताचे खच्चीकरण करत असेल तर भारत व चीन अफगाणिस्तान संबंधाचा भारताने नव्या पध्दतीने विचार करणे आवश्यक ठरेल.
(५) तालीबानी आंतकवाद्याच्या इहशतवादी कारवाया भारतात वाढत असेल तर याचा विरोध U.N.O च्या सुरक्षा परीषदेमध्ये भारताने करने आवश्यक ठरते

**भारताने संबंधात समतोल कसा साधावा?**

(१) सर्व प्रथम भारताने अफगाणिस्तान व चीन संबंध जोपासतांना भारताच्या सार्वभौमत्वाला व सुरक्षेला तडा जाणार या कडे जातीने लक्ष ध्यावे.
(२) पाकिस्तान, अफगाणिस्तानच्या मदतीने भारतात दहशतवादी कारवाया करत असेल तर भारताने आपल्या आंतरीक सुरक्षीततेची धोरणे ताठर करून त्यास प्रतिउत्तर घावे.
(३) संयुक्त राष्ट्राच्या पाच स्थायी (व्हेटोधारी) राष्ट्रमध्ये सहभाग मिळवण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य मागावे त्याचबरोबर चीनच्या विरोधाला प्रतीउत्तर देणे आवश्यक ठरेल.
(४) चीनच्या वाढत्या सामाज्यवादी धोरणावर लगाम लावण्यासाठी आपल्या देशाच्या सीमा सक्षम व

सुरक्षित कराव्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर चीनचा विरोध करावा.

(५) भारतात इहशतवादी संघटनांनकडून दहशतवाद्यांना कोणतीही फंडीग होणार नाही यासाठी आपली सुरक्षायंत्रणा व सायबर प्रणाली सक्षम करावी.

(६) या दोघेराष्ट्रांशी आर्थिक राजकीय व्यवहार सुरळीत ठेवावा. परंतु जर या दोन्ही राष्ट्राकडून जर भारताच्या सार्वभौमत्वावर आक्रमण होत असेल तर "आर्थिक व्यवहारावर बंदी" आणावी. तसेच राजकीय व सामजिक आर्थिक अस्थिरता निर्माण करणाऱ्या "मोबाईल ॲप" वर बंदी घालावी.

(७) भारताचे परराष्ट्रीय धोरण ताठर असावे जेणे करून भारताच्या शांती अहिंसेच्या धोरणाचा गैरुफयदा कोणालाही घेता येऊ नये.

(८) भारताचा काश्मिरप्रश्न हा आंतरीक आहे त्यामुळे इतर राष्ट्रांना या प्रश्नामध्ये विशेषकडून आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांना ढवळाढवळ करु देऊ नये.

(९) सक्षम सुरक्षा यंत्रणा, सक्षम पोलीस यंत्रणा, प्रबळराजकीय इच्छाशक्ती व जशास-तसे उत्तर देण्याची ताकद भारताने दाखवावी.

(१०)मुल्यमापन :- भारताचे परराष्ट्रीय धोरणाचा मुख्य आधार "पंचशिल" धोरण आहे नेहरुपासून तर मोदि सरकार पर्यंत या सर्वांना परराष्ट्रीय धोरणाचा मुख्य आधार पंचशिलालाच ठरवीले. त्यामुळे त्या बाबतीत कोणतीही चूक भारताकडून होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक ठरते.

पाक, चीन व तालेबान सरकार या बरोबर भारताचे संबंध थोडेफार तणावग्रस्त जरी असले तर शेवटी प्रश्न हे आपसी सामज्यस्यातुन सुटत असतात. त्याला युध्द, दहशतवादी कारवाया हा पर्याय होऊ शकत नाही हे जरी खरे असले तरी परराष्ट्रीय धोरणाची तत्वे परीस्थितीनुसार बदलणे व राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य देणे हे अगत्याचे ठरते हे विसरुन चालणार नाही.

**संदर्भ सुचि :-**

(१)राठी शुभांगी - भारताचे शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जुलै-२०१४, पान.नं. ८७.

(२) नलावडे पंडित – आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद प्रथम आवृत्ती – २०१४, पान.नं. ७६ [ISBN-93-84451-21-9].

(३) उपरोक्त पान.नं. ७६.